
ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १५ मे, १९६८ | अंक १०



**भटक्या मांजरांसाठी निधी**—ब्रिटनमधील एका वृद्ध महिलेने मृत्युपत्र करून भटक्या मांजरांच्या योगक्षेमाची व्यवस्था करण्यासाठी ३० हजार पौंड रक्कम आणि दोन घरे ठेवली आहेत. तिचे म्हणणे असे की कुत्र्यांची सोय करणारे पुष्कळ लोक निघतात; पण मांजरांसाठी अशी व्यवस्था नाही. ब्रिटनच्या प्राणिक्लेशनिवारक संस्थेच्या निधीकडे ही मालमत्ता देण्यात येणार आहे.

**प्राचीन इतिहासावर प्रकाश**— पश्चिम बंगालमधील हरिनारायणपूर गावाजवळ २ हजार वर्षांपूर्वीच्या मातीच्या पक्क्या भांड्यांचे अवशेष आढळून आले आहेत. त्यावर खरोष्ठी लिपीतील काही अक्षरे दिसून आली आहेत. ही भांडी शक-कुशान टोळ्यांच्या काळातील असावीत. त्यावरून बंगालच्या पश्चिमेकडील देशांशी असलल्या सबंधावर प्रकाश पडेल.

**मौंट एव्हरेस्टवर जाण्याचा चिन्यांचा प्रयत्न**— मौंट एव्हरेस्ट चढून जाण्याचा चिनी गिर्यारोहकांचा प्रयत्न चालू असावा, असे नेपाळमधील शेरपांच्या मार्फत आलेल्या बातमीवरून समजते. २४–२५ मे, १९६० च्या मध्यरात्री ह्या शिखरावर गेल्याचा चिन्यांनी दावा केला होता, परंतु बहुतेक गिर्यारोहकांचा त्यावर विश्वास बसला नाही.

**मोटारीसाठी थांबलेले ग्राहक**—भारतामधील मोटार कारखान्यांत मोटारीसाठी नावे नोंदविलेल्या १ लाख, २५ हजार लोकांना अद्याप गाड्या मिळालेल्या नाहीत. त्याचप्रमाणे स्कूटर्ससाठी नाव नोंदविलेल्या २॥ लाख ग्राहकांनाही थांबावे लागत आहे. स्कूटर्सच्या मागणीपैकी ३३ टक्क्यांपेक्षाही कमी मागणी कारखाने पुरवू शकतात.

**घड्याळांचे उत्पादन वाढणार**—बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्यातील घड्याळांचे उत्पादन दरसाल ३ लाख, ६० हजारपर्यंत वाढविण्यात येणार आहे. आतापर्यंत कारखान्यात तयार झालेली १० लाखांपेक्षा अधिक घड्याळे विकण्यात आली आहेत. घड्याळांसाठी मागणी एकसारखी वाढत आहे.

**हायकोर्टात पडून राहिलेले दावे**— भारतातील १६ हायकोर्टात मिळून १९६७ मध्ये ३, ३४, ५२९ दावे अनिर्णित होते. सर्वात जास्त अनिर्णित दावे (६३,६०२) असण्याचा मान अलाहाबाद हायकोर्टाकडे गेला. कलकत्ता (५४,५०१), मद्रास (३४, ११२), मुंबई (३०,२६७), केरळ (२६,१६८), आंध्र प्रदेश (२५,४२९), आणि दिल्ली (१५,५९१) अशी इतर हायकोर्टांची आकडेवारी आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १५ मे, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## विमाननिर्मितीसाठी दीर्घ तपश्चर्येची आवश्यकता

विमानविद्या आणि त्यासंबंधीचे शिक्षण ह्यासंबंधी बंगलोर येथे एक परिसंवाद भरविण्यात आला होता. विमानांच्या निर्मितीत भाग घेणारे कारखाने, वैमानिकांना शिक्षण देणाऱ्या संस्था आणि विमानविद्येचे विद्यार्थी ह्यांच्या प्रतिनिधींनी परिसंवादात भाग घेतला होता. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. ह्या संघटनेचे मॅनेजिंग डायरेक्टर एअर मार्शल पी. सी. लाल ह्या प्रसंगी केलेल्या भाषणात म्हणाले की पाश्चिमात्य देशात विमानबांधणीच्या धंद्यात जी प्रगती करण्यात आली आहे तिच्या बरोबरीला येण्यासाठी भारताला किमान ५ वर्षे तरी लागतील. खरे म्हणजे १५ वर्षांचा अवधीही ह्यासाठी पुरा पडेलच असे म्हणता येणार नाही. सध्या ह्या धंद्यात काहीशी अगतिकता उत्पन्न झालेली आहे. ती नाहीशी करण्यास काही काळ लागणारच. येत्या ४–५ वर्षांच्या काळात विमानबांधणीचे काम करणारे शेकडो इंजिनिअर्स लागणार आहेत. भारताला नव्या प्रकारच्या विमानांचे नमुने शोधून काढून त्यांची निर्मिती करावी लागेल. विमानबांधणीच्या धंद्याची राष्ट्रीय उद्दिष्टे आता स्पष्ट होऊ लागली आहेत. गेल्या पाच वर्षांत विमानबांधणीच्या धंद्यात खूपच बदल झालेला आहे. कारण, लष्करी विमानांच्या बांधणीचे काम अलीकडे अतिशय कुशलतेचे झाले आहे. कांही तंत्रज्ञांना परदेशी जाऊन शिक्षण घेण्याबद्दल जबरदस्त आकर्षण असते. अशा लोकांनी त्यांना जमेल तेथे निघून जावे. जे लोक भारतातच राहून काम करू इच्छितात त्यांनाच अधिक महत्त्व आहे. भारताच्या विमानदलात आणि विमानविद्येच्या इतर संघटनांत अडचणीच्या परिस्थितीत काम करणाऱ्यांचीच आवश्यकता आहे.

## बुटांच्या कारखान्यासाठी यंत्रसामग्री

बूट तयार करण्याचा एक कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागात काढण्यास नियोजन समितीने आणि भारत सरकारच्या अर्थखात्याने मंजुरी दिली आहे. कारखान्याची योजना अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. त्याविषयी विचार चालू आहे. कारखाना व्यापार-महामंडळातर्फे काढण्यात यावयाचा आहे. बुटांची परदेशांना, विशेषतः रशियाला निर्यात करण्याच्या दृष्टीने कारखान्याची उभारणी करण्यात येणार आहे. व्यापार-महामंडळ खाजगी मालकीच्या कारखान्यांकडून पादत्राणे घेऊन ती निर्यात करण्याचे काम आजही करीत आहे. परंतु ह्या मार्गाने होणारा मालाचा पुरवठा काहीसा अनिश्चित असतो असा अनुभव आला आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागात निर्यातीसाठी उत्पादन करणारा खास कारखाना स्थापन करण्यात आल्यास मालाचा पुरवठा त्वरित आणि खात्रीचा होईल अशी अपेक्षा आहे. कारखान्यासाठी लागणारी सर्व यंत्रसामग्री पुरविण्याची तयारी रशियाने दाखविली आहे. कारखाना स्थापन करण्यासाठी इटलीकडून कर्ज मिळविण्याची खटपटही सरकार करीत आहे. कानपूर जवळच्या ग्रामीण भागातील जागा कारखान्यासाठी निवडण्यात येण्याचा संभव आहे. ह्या भागात कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल विपुलतेने मिळण्यासारखा आहे. त्याशिवाय काम करण्यासाठी लागणारा मजूरवर्गही अल्प वेतनावर मिळण्याची खात्री आहे. नवा कारखाना काढण्यापेक्षा खाजगी क्षेत्रातील एक चालू कारखानाच मंडळाने विकत घ्यावा अशी सूचना करण्यात आली होती. परंतु ह्या कारखान्याची यंत्र-सामग्री जुनीपुराणी झालेली असल्याने हा उपक्रम किफायतशीर ठरणार नाही असा सल्ला मिळाला.

## राजभवनांची शान राखणे कठीण होत आहे.

राज्यांच्या गव्हर्नरांची वसतिस्थाने म्हणून राजभवनांचा दिमाख किमान पातळीवर संभाळावा लागतो. परंतु आता त्यांचा डौल व दिमाख राखणे कठीण होत चालले आहे. कारण गेल्या काही वर्षांत झालेली महागाई. मध्यवर्ती सरकारने राजभवनावरील खर्चात काटकसर करण्याचा आदेश दिलेला आहे. तो सामान्यपणे पाळण्यातही येतो. तथापि ह्या काटकसरीचा परिणाम गव्हर्नरांना भोगावा लागत आहे. एका राजभवनातल्या सतरंज्या व गालिचे ३० वर्षांचे जुने झाले आहेत. त्यांना पराकोटीची अवकळा प्राप्त झाली आहे. परंतु नवीन सतरंज्या घेण्यास पैसा नाही. त्यामुळे तेथील गव्हर्नरांना पाहुणे बोलावणे अशक्य होत चालले आहे. मोठ्या इतमामाची राजभवने संभाळत बसण्यापेक्षा गव्हर्नरांना कमी पगार देऊन सरकारी खर्चाने राहण्याच्या जागा पुरवाव्यात असे मत काही गव्हर्नरांनी व्यक्त केले आहे. राजभवनांची स्थिती अधिक चांगली ठेवण्यासाठी मध्यवर्ती गृहखात्याने लोकसभेत अलीकडेच एक बिल मांडून १९६६–६७ सालासाठी ८ लाख रुपये जादा खर्चाची तरतूद केली होती.

**स्वीडनकडून खतांची देणगी**—स्वीडनने भारताला ९० हजार टन खत देणगी म्हणून देण्याचे ठरविले आहे. सर्व खत तीन वर्षांच्या अवधीत पुरविण्यात येणार असून त्याची किंमत ४·५ कोटी रुपये आहे. ह्या खताची भारतात विक्री करण्यात आल्यावर आलेल्या पैशाचा उपयोग अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी आखण्यात आलेल्या योजनांसाठी करण्यात येणार आहे.

**पूर्व पाकिस्तानात तेलाचा कारखाना**—पूर्व पाकिस्तानात चितगाव येथे त्या भागातील पहिला तेलशुद्धीचा कारखाना उभारण्यात आला आहे. कारखान्यासाठी लागणारे अशुद्ध तेल परदेशातून आयात करण्यात येणार आहे. त्यात दरसाल १५ लाख टन तेल शुद्ध करण्यात येईल. कारखान्याच्या भांडवलापैकी ७० टक्के भांडवल पाकिस्तानी नागरिकांच्या मालकीचे असून बाकीचे बर्मा शेल कंपनीने उभारले आहे. कारखान्यामुळे पूर्व पाकिस्तान तेलाच्या बाबतीत बराच स्वयंपूर्ण होईल.


**पोलंडमध्ये ज्यूंचे स्मारक** — दुसऱ्या महायुद्धात ऑसविट्झ येथील तुरुंगात जर्मन अधिकाऱ्यांनी ६० लाख युरोपीय ज्यू लोकांची अमानुष हत्या केली होती. ह्या ज्यूंच्या स्मरणासाठी तुरुंगातच आता एक इमारत बांधण्यात आली असून तुरुंगाच्या दारापाशी एक संगमरवरी स्मारक-स्तंभ बसविण्यात आला आहे.

**शाईच्या कारखान्यासाठी सहकार्य** — छापण्याची शाई तयार करण्याचा एक कारखाना केनिआतील मोंबासा ह्या ठिकाणी काढण्यात आला आहे. कारखान्यासाठी भारताने ५ लाख रुपयांची यंत्रसामग्री पुरविली आहे. कारखान्याची उभारणी हिंदी तंत्रज्ञांनी केली असून तो भारत व केनिआ ह्यांच्या सहकार्याने स्थापन करण्यात आला आहे.

**सहकारी खत कारखाना**— कांडला येथे सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा एक खताचा कारखाना उभारण्यात येत आहे. उभारणीचे काम १९७०–७१ मध्ये पूर्ण होईल. त्याच्या उभारणीसाठी ८९ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्यात दरसाल सुमारे १३ लाख टन निरनिराळ्या प्रकारची खते उत्पादन करण्यात येतील. अमेरिकेमधील सहकारी संस्थांच्या मध्यवर्ती संघटनेने कारखाना उभारण्याच्या कामी सहकार्य केले आहे.

**जस्त गाळण्याचा कारखाना**—उदयपूरजवळ हिंदुस्थान झिंक लि. हा सार्वजनिक मालकीचा जस्त गाळण्याचा कारखाना चालू करण्यात आला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १६ कोटी रुपयांचे भांडवल लागले. जस्ताची आयात करण्यासाठी भारताला दरसाल ३० कोटी रुपये खर्च करावे लागतात. आता आयातीच्या खर्चात काही बचत होईल. कारखाना एका फ्रेंच कंपनीच्या साह्याने उभारण्यात आला आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६६,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

## सिनेनटांकडे थकलेली प्राप्तिकराची बाकी

लोकसभेत विचारलेल्या एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना सिनेनटांकडे थकलेल्या प्राप्तिकराच्या बाकीविषयी माहिती देण्यात आली. तिचा तपशील असा. दि. १ एप्रिल १९६८ रोजी राजकपूर ह्या नटाकडे रु. ९ लाख, २२ हजारावर थकबाकी होती. मेहबूब ह्या नटाकडे ८ लाख, ७८ हजारावर बाकी होती. दिलीपकुमार, आशा पारेख, शर्मिला टागोर आणि नंदा ह्यांच्याकडे काहीही बाकी नव्हती. देवआनंदकडे १ लाख, ९९ हजार, राजेंद्रकुमारकडे ६९ हजार, वैजयंतीमालाकडे २६,६२० आणि विश्वजितकडे ५,५०० रुपये बाकी होती. थकबाकी असलेल्या काही नटनटींना हप्त्याने पैसे भरण्याची सवलत देण्यात आली आहे; तर काही जणांना बाकी भरण्यास अधिक वेळ देण्यात आला आहे. त्याशिवाय थकबाकी वसूल करण्यासाठी जरूर तेथे इतर उपाय योजण्यात आले.

## भिलाई पोलाद कारखान्याची परदेशी मिळकत

१९६७–६८ साली भिलाई येथील पोलादाच्या कारखान्याने २८·२३ कोटी रुपये किमतीच्या पोलादाची व बिडाच्या लोखंडाची परदेशी निर्यात केली. त्यामागील वर्षात निर्यात केलेल्या मालाच्या किमतीपेक्षा ही मिळकत ३·५ पटीने अधिक आहे. कारखान्याने पोलाद व लोखंडाची देशात केलेली विक्री ७८·८ कोटी रुपयांच्या घरात आहे. कारखान्यातील बिडाच्या लोखंडाचे सर्वात मोठे गिऱ्हाईक जपान आहे. त्या देशाने भारताकडून ४ लाख टन लोखंडाची आयात केली. कारखान्याने १६ देशांना पोलादाचा माल आतापर्यंत निर्यात केला आहे. त्यात ब्रिटन, फ्रान्स, युगोस्लाव्हिआ आणि पाकिस्तान ह्यांचा समावेश आहे. चालू वर्षी इराणने प्रथमच भिलाई येथील कारखान्यात तयार झालेले रेल्वेचे रूळ विकत घेतले आहेत. रेल्वेच्या रुळांची देशातील मागणी मात्र कमी झालेली आहे.

## नालासोपारा येथे बुद्धधर्माचे केंद्र

मुंबईपासून २६ मैलावर असलेल्या नालासोपारा ह्या ठिकाणी बुद्धधर्माचे एक जागतिक केंद्र स्थापन करण्याचा विचार चालू आहे. नालासोपारा भागात बुद्धकालीन अनेक अवशेष विखुरलेले आहेत. त्यात काही सम्राट अशोकाच्या कालातीलही आहेत. ह्या ठिकाणी केंद्र उभारण्याच्या कामी कंबोडियाचे प्रिन्स सिहनूक ह्यांनी बरीच आस्था दाखविली आहे. केंद्राच्या उभारणीसाठी २ हजार रुपयांची देणगीही त्यांच्याकडून मिळाली आहे. संकल्पित केंद्रात पाली भाषेचे शिक्षण देणारी एक शाळा, एक मॉंटेसरी शाळा आणि एक तांत्रिक शाळा स्थापन करण्याचे घाटत आहे. केंद्राची स्थापना झाल्यास आशिया खंडातून भारतात येणाऱ्या बुद्धधर्मीयांना ते एक मोठे आकर्षण होऊ शकेल.

## जुन्या मोटारी मोडण्यासाठी कारखाने

अमेरिकेत जुन्या झालेल्या मोटारी मोकळ्या जागेत टाकून देण्यात येतात. अशा जागांना मोटारींची स्मशानभूमी अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे. ह्या मोटारींची मोडतोड करून त्यातील पोलादाची परत पोलाद–कारखान्यांकडे पाठवणी करण्यात येते. मोडतोड करण्यासाठी खास कारखानेच उभारण्यात आलेले आहेत. हा प्रकार अलीकडे ब्रिटनमध्येही दिसून येऊ लागला आहे. ब्रिटनमध्ये दरसाल ७ लाख ते १० लाख जुन्या मोटारी त्यांचे मालक रस्त्यावरच सोडून देतात. एकट्या लंडन शहरातच दरसाल ४२ हजार मोटारी अशा रीतीने बेवारशी होतात. मग अर्थातच त्यांची पुढील व्यवस्था लावावी लागते. ती लावण्यासाठी ब्रिटनमध्ये आता ४ कारखाने स्थापन करण्यात आले आहेत. स्वीडनमध्ये अशा बेवारशी मोटारी समुद्रात ढकलून दिल्या जातात.


हे बोधचिन्ह ओळखा
आणि रेडिओवरील जाहिरातीकरिता घोषवाक्य सुचवा.




प्रवेश विनामूल्य
प्रवेश पत्रिका ह्यांचेकडून मिळवा:
अल्को ॲडव्हर्टायझींग,
बी. पी. ए. हम्स,
१०७ म. गांधी रोड, मुंबई-१.
पॅरामाउंट पब्लिसिटी प्रा. लि.,
४८१ शनिवार पेठ, पुणे-२.
प्रतिभा ॲडव्हर्टायझिंग,
३३/९ प्रभात रस्ता, पुणे-४.
EM/68/20

**मेदवृद्धी कमी करण्याचा किफायतशीर धंदा**

ब्रिटनमध्ये मेदवृद्धी कमी करण्यासाठी उपाय सुचविणाऱ्या अनेक संस्था किफायतशीर धंदा करीत आहेत. शरीर प्रमाणबद्ध असले तर ते डौलदार दिसते; पण मेद वाढल्यामुळे ते बेडौल होऊन शिवाय कांही रोगांचे भक्ष्यही होते. तेव्हा निव्वळ आरोग्य राखण्यासाठी सुटसुटीत शरीर असण्याची आवश्यकता सर्वमान्य झालेली आहे. ह्या प्रवृत्तीचा फायदा घेऊन ब्रिटनमधील अनेक कृत्यांनी निरनिराळ्या प्रकारची उपकरणे तयार करून ती वापरण्याचा सल्ला लठ्ठ माणसांना देण्यास सुरवात केली आहे. त्यात एक वल्ही मारण्याची क्रिया करावयास लावणारे यंत्र आहे. त्याची किंमत ५० पौंड आहे. त्याशिवाय इलेक्ट्रॉनिक्सच्या शास्त्राने काम करणारी अनेक उपकरणे काढण्यात आली आहेत. त्यांच्या किंमती तर १०० पौंडांच्या आसपास आहेत. आहार–विहाराविषयी तपशीलवार सूचनाही देण्यात येतात. लंडनमधील एका वृत्तपत्राने प्रमाणाबाहेर लठ्ठ असणाऱ्या माणसांची अलीकडे एक पाहणी केली होती. तीत असे दिसून आले की ब्रिटनमध्ये २·२ कोटी वयात आलेली माणसे वाजवीपेक्षा अधिक स्थूल आहेत, आणि त्यापैकी निम्मी संख्या स्त्रियांची आहे. भारतांत अशा प्रकारची पाहणी केली तर काय दृश्य उघडकीस येईल ते सांगणे कठीण असले तरी सकस अन्नाच्या अभावी बहुसंख्य हिंदी नागरिकांना स्थूल होण्याची संधीच मिळत नसावी असा अंदाज करण्यास हरकत नाही. अर्थात, स्वातंत्र्यानंतरची आर्थिक सुबत्ता ज्यांना लाभली त्यांची गोष्ट वेगळी. सडपातळ होण्यासाठी सल्ला देणाऱ्या ब्रिटनमधील संस्था स्वयंपाकघरापर्यंत पोचल्या आहेत. 'चोरून खाणे म्हणजे गुन्हा आहे' 'जाता–येता खाऊ नका', 'तुम्ही कोण आहात, उंदीर की स्त्री?' अशी बोधवाक्येही स्वयंपाकघरात लावलेली आढळून येतात.

---

**दहा रुपये किमतीचे चांदीचे नाणे—** भारत सरकारला १० रुपये किमतीचे चांदीचे नाणे काढण्यास परवानगी देणारे इंडियन कॉयनेज (दुरुस्ती) बिल लोकसभेने मंजूर केले आहे.

**कर देणारे पहिले दहा—**१९६६-६७ मधील कर आकारणीप्रमाणे, भारतातील कर देणारांत इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज (इंडिया) प्रायव्हेट लि. ही अग्रेसर आहे. इंडियन आयर्न अँड स्टील कं., बर्मा शेल रिफायनरीज, असोसिएटेड सिमेन्स, हिंदुस्थान लिव्हर, कलकत्ता इलेक्ट्रिक स. कं., टेल्को, महाराष्ट्र स्टेट रोड ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन, बर्मा शेल आणि ग्वालियर रेयॉन सिल्क मॅ. कं. ह्यांचा त्यानंतर अनुक्रम लागतो.

**ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट बोर्डाची मागणी—** ऑस्ट्रेलियाच्या भारतातील १९६९ मधील दौऱ्यातील प्रत्येक कसोटी सामन्यास २५,००० ऑस्ट्रेलियन डॉलर आणि इतर तीन सामन्यास प्रत्येकी ५,००० ऑस्ट्रेलियन डॉलर मिळण्याची हमी ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट बोर्डाने मागितली आहे. (१ ऑ. डॉलर= ८·५ रुपये).


तारेचा पत्ता
"मॉर्गेज"

मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र २५६५२७

**मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई**

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर
कार्यकारी संचालक


---


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :-३०३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

### अमेरिकेतील दारिद्र्यपीडित लोकांची अवस्था

गेल्या वर्षी अमेरिकेतील दारिद्र्यपीडित लोकांच्यासंबंधी सरकारने नेमलेल्या एका पाहणी मंडळाने अहवाल सादर केला होता. अहवालातील माहितीप्रमाणे धनकनकसंपन्न अमेरिकेत सुमारे ४.१ कोटी लोक दारिद्र्यात दिवस कंठीत होते, त्यापैकी काहींची अवस्था तर अतिशय दीन अशी होती. अलीकडे वॉशिंग्टनमधील एका बिनसरकारी संघटनेने दारिद्र्यग्रस्त लोकांची नव्याने पाहणी केली आहे. पाहणीत आढळलेल्या परिस्थितीविषयी स्पष्ट मतप्रदर्शन करताना संघटनेने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, "पाश्चिमात्य देशांपैकी कोठलाही देश इतक्या मोठ्या लोकसंख्येला इतक्या दीन अवस्थेत जीवन जगण्यास भाग पाडीत नाही. देशातील चारपंचमांश लोकांना संपन्नतेच्या शिखरावर बसविण्यासाठी एक पंचमांश लोकांना अत्यंत निर्दयपणे हीनदीन करण्यात येत आहे." अमेरिकेने देशातील दारिद्र्य हटविण्यासाठी अलीकडे दरसाल २,५०० कोटी डॉलर्स खर्च करण्यास प्रारंभ केला आहे. १९६० सालातील खर्चाशी तुलना करता हा खर्च जवळजवळ २॥ पट अधिक आहे. परंतु तरीही दारिद्र्याचे निर्मूलन करण्याचे कार्य अजून बहुतांशी शिल्लकच आहे. अमेरिकेतील राहणीमानाप्रमाणे सुमारे २.९ कोटी लोकांना दारिद्र्यनिवारणासाठी मदत करणे आवश्यक आहे. परंतु त्यातील ५४ लाख लोकांनाच काय तो सरकारी मदतीचा लाभ होत आहे. उरलेले लोक अजूनही अर्धपोटी आणि निकस आहारावर कसेबसे जगत आहेत. त्यातही निग्रोंची वस्ती असलेल्या भागात दारिद्र्याची भेसुरता दृष्टोत्पत्तीस येते. अमेरिकेतील वर्णभेदाची पाळेमुळे बऱ्याच प्रमाणात ह्या दारिद्र्यात खोल रुजलेली आहेत.

---

### गोव्यात कापडाची पहिली गिरणी

पुढील वर्षाच्या प्रारंभाला गोव्यातील पहिली कापडाची गिरणी कापड काढण्यास सुरुवात करील असा अंदाज आहे. ह्या गिरणीच्या उभारणीसाठी ४ कोटी रुपयांचे भांडवल लागणार असून त्यात ६०० कामगारांना रोजगार मिळेल. गिरणीत सूत कातण्याच्या २५ हजार चात्या बसविण्यात येणार आहेत. यंत्रचलित मागांची संख्या ५०० पर्यंत असेल. गिरणीसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी ७० टक्के यंत्रे परदेशांतून आयात करण्यात येणार आहेत. संकल्पित गिरणीत दरमहा सुमारे ५ लाख मीटर कापड विणण्यात येईल. ह्या शिवाय मार्मगोवा येथेही एक कापडाची गिरणी स्थापन होणार आहे. १९६९ च्या दुसऱ्या सहामाहीत तीत उत्पादनास प्रारंभ होईल. ह्या दुसऱ्या गिरणीतही २६ हजार चात्या आणि ५०० यंत्रचलित माग बसविण्यात येणार आहेत.

### छोट्या मोटारींच्या कारखान्यासाठी सहकार्य

भारतात छोट्या मोटारी तयार करण्याचा कारखाना काढण्याबद्दल गेली काही वर्षे चर्चा चालू आहे. असा कारखाना काढण्याच्या मार्गात परदेशीय चलनाची टंचाई ही अडचण प्रमुख आहे. कारखाना काढण्यासाठी सुमारे ४० कोटी रुपयांचे परदेशीय चलन लागणार आहे. हाँगकाँगमधील तिघा हिंदी व्यापाऱ्यांनी हा कारखाना काढण्याची तयारी दाखविली आहे. त्यासाठी लागणारा परदेशीय चलनासाठी सर्व पैसा ते स्वतःच उभा करण्यास तयार आहेत. परंतु, परदेशीय चलनासंबंधीच्या कडक नियमात काही शिथिलता असावी असा त्यांचा आग्रह आहे. भारत सरकारने कारखान्याची योजना आखून दिल्यास ती ठरलेल्या मुदतीत पार पाडण्यास ते तयार आहेत. हाँगकाँग, सिंगापूर, मॅलेशिया भागांत १९ हिंदी कोट्याधीश व ६३ लखपती आहेत.

---

### तंतुवाद्यांच्या निर्यातीने हुंडणावळीची प्राप्ती

अमेरिकेत आणि पश्चिम युरोपातील देशात भारतीय संगीताबरोबर सतार व इतर तंतुवाद्ये ह्यांचा प्रसार वाढत आहे. त्यामुळे सतारी व इतर तंतुवाद्ये ह्यांच्या निर्यातीलाही मोठा बहर आला आहे. १९६७–६८ ह्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या दहा महिन्यात तंतुवाद्यांच्या निर्यातीमुळे भारताला ५॥ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळाले. त्यामागील दोन आर्थिक वर्षाच्या ह्याच काळातील प्राप्तीचे आकडे अनुक्रमे ७८ हजार आणि १८ हजार असे आहेत. सर्वांत अधिक वाद्ये अमेरिकेने आयात केली. एकूण २,३१६ तंतुवाद्यांची अमेरिकेला निर्यात करण्यात आली. त्याची किंमत म्हणून ४,७३ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती झाली. अमेरिकेखालोखाल कॅनडाने तंतुवाद्यांची आयात केली.

---

### खासगी कंपनीचा साखरकारखाना सहकारी क्षेत्रात येणार

ब्रॅडी कंपनीच्या ताब्यात असलेला गंगापूर साखरकारखाना सहकारी तत्त्वावर चालविण्यासाठी 'गंगापूर सहकारी साखरकारखाना लि.' ह्या संस्थेची अधिकृत नोंदणी दि. २२ एप्रिल १९६८ रोजी करण्यात आली. महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब पवार हे ह्या नव्या सहकारी साखरकारखान्याचे मुख्य प्रवर्तक आहेत. या कारखान्याची सभासदनोंदणी जोरात सुरू असून आतापर्यंत २,४०० शेतकरी सभासद झाले आहेत. खाजगी कंपनीकडून सहकारी क्षेत्रात येणारा हा पहिलाच साखरकारखाना असून, कारखान्याची किंमत वगैरे ठरून तो ताब्यात घेण्याचा व्यवहार लौकरच पुरा होईल.

## नेफातील गिरिजनांचे अतिव दारिद्र्य

१९६२ मध्ये नेफा भागात चीनने आक्रमण केले. तेव्हापासून ह्या डोंगराळ भागातील लोकांची भरभराट घडवून आणण्याच्या प्रयत्नांना विशेष जोराने प्रारंभ झाला. ह्या प्रयत्नांना थोडेफार यश येत असले तरी डोंगराळ भागात कष्टाचे जिणे जगणाऱ्या ह्या लोकांचे दारिद्र्य अद्यापही पराकोटीचे आहे. नेफा भूप्रदेशात निरनिराळ्या जमातींच्या सुमारे ३ लाख, ३० हजार लोकांची वस्ती आहे. हे सर्वजण घाणेरड्या अवस्थेत जगतात. त्यांच्यात रोगराईही खूप आहे. त्यांच्या जीवनाची पाहणी नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेने अलीकडे केली आहे. पाहणी पुरी होण्यास दोन वर्षांचा काळ लागला. नेफा भागातील शेती ही अतिशय मागासलेली आहे. काही थोडी ठिकाणे सोडल्यास अनेक भागांत अद्याप नांगरही माहीत झालेला नाही. थंड हवा, कपड्यांची कमतरता आणि दूर अंतरावरून आणावे लागणारे पाणी ह्यामुळे स्वच्छता राखणे अतिशय अवघड जाते. बहुतेक घरांना खिडक्या नसतात. ह्या झोपड्यांतून मध्यभागी २४ तास विस्तव पेटता ठेवलेला असतो. त्याच्या धुराने झोपड्यांत राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर फार वाईट परिणाम होतो. संडास आणि मुताऱ्या अशा नसतातच. झोपड्यांच्या मागील बाजूच्या जागेचा त्या कामासाठी उपयोग करण्यात येतो. सफाईचे काम डुकरे करतात. हीच डुकरे मारून खाली जातात. अर्थात रोगराईला अनुकूल अशी भूमी नेहमीच तयार असते. मृत्यूचे प्रमाण मोठे असल्याने लोकसंख्येत फारशी वाढ अशी होतच नाही. अलीकडे दळणवळणाची साधने आणि शिक्षण ह्या दोन बाबतींत मात्र प्रगती झाली आहे.

---


## अमेरिकेचा पेशावरजवळील तळ

अत्याधुनिक साधनांनी दळणवळण करणारा एक तळ अमेरिकेने पाकिस्तानमधील पेशावरनजीक उभारलेला आहे. १९५९ च्या जुलै महिन्यांत पाकिस्तानशी करार करून अमेरिकेच्या विमानदलाने त्याची उभारणी केली. त्या वेळी त्याची मुदत १० वर्षांची ठेवण्यात आली होती. ही मुदत लवकरच संपत असल्याने तळाची मुदत आणखी १० वर्षांनी वाढविण्याची खटपट अमेरिका करीत आहे. तळावरील इलेक्ट्रॉनिक साधनांनी रशिया व चीन ह्यांच्या लष्करी दळणवळणावर नजर ठेवता येते. त्यामुळे हे दोन्ही देश त्याच्या विरुद्ध आहेत. खुद्द पाकिस्तानची लष्करी स्वरूपाची माहिती मिळविणेही अमेरिकेला त्यामुळे शक्य होते. म्हणून पाकिस्तानही तळ ठेवण्याची मुदत वाढविण्यास नाखूष असल्याची वार्ता आहे.


---


श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS



चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
•मजबूत बांधणी
•अद्यावत् यंत्र योजना
•साईज १४", १६", १८"
फोन नं. १६९

उत्पादक –
भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

### रेल्वेगाड्या अधिक वेगाने धावणार

येत्या गांधीजयंतीपासून म्हणजे २ ऑक्टोबर पासून हिंदमधील रेल्वे मार्गांवर धावणाऱ्या काही गाड्यांचा वेग वाढविण्यात येणार आहे. वेग वाढविण्याची योजना टप्प्या टप्प्याने अमलात येणार आहे. पहिल्या टप्प्यात राजधानी दिल्लीपासून कलकत्ता, मद्रास व मुंबईला जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्यांचा वेग वाढविण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर ह्या दिवशी दिल्ली-कलकत्ता मार्गावर दर तासाला १२५ किलोमीटर अंतर तोडणारी गाडी पहिला प्रवास करील. वाटेत फक्त कानपूर व मोगलसराई ही स्टेशने घेऊन ही गाडी कलकत्त्याचा प्रवास १७॥ तासांत पुरा करील. १९६९ साल संपण्यापूर्वी अशाच प्रकारच्या वेगवान गाड्या दिल्ली-मुंबई, व दिल्ली-मद्रास ह्यांच्या दरम्यान चालू करण्यात येणार आहेत. वेगवाढीच्या दुसऱ्या टप्प्यात रेल्वेवरील प्रमुख मार्गांवर धावणाऱ्या गाड्यांचा वेग वाढविण्यात येईल. ह्या मार्गांवरील गाड्यांचा वेग दर तासाला १०० किलोमीटर करण्यात येणार आहे. त्यामुळे भारतामधील प्रमुख शहरांना जोडणाऱ्या गाड्यांना प्रवासासाठी लागणाऱ्या वेळात बरीच कपात होईल. दिल्ली-कलकत्ता मार्गावर धावणाऱ्या गाडीची चाचणी घेण्याचे काम पूर्ण झाले आहे. लोहमार्ग व गाडी ह्यांची कार्यक्षमता अजमावण्यासाठी चाचणीच्या गाडीवर खास उपकरणे बसविण्यात आली होती. भारतामधील रेल्वेला वाहतुकीच्या बाबतीत इतर साधनांशी स्पर्धा करावी लागते. मोटारवहातूक रेल्वेवाहतुकीला विशेष स्पर्धा करीत असते. रेल्वेगाड्यांचा वेग वाढविल्यास ह्या इतर साधनांशी रेल्वे अधिक प्रभावी स्पर्धा करू शकेल. वेगवान गाड्यांचा वापर करण्यासाठी रूळ आणि सिग्नलिंगची व्यवस्था उत्कृष्ट करण्यात येत आहे.

### स्त्रियांच्यासाठी बँकिंगचे क्लासेस

दि बँक ऑफ इंडिया व दि बँक ऑफ बरोडा स्टाफ ट्रेनिंग कॉलेज तर्फे (श्री सदन, मुंबई ६) स्त्रियांच्यामध्ये बँकिंगच्या ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी खास स्त्रियांचेसाठी पाच दिवसांचे खास वर्ग चालविण्यात येतात. येता वर्ग ३ जून, १९६८ रोजी सुरू होईल. अर्जदार स्त्रीचे किमान वय २५ वर्षे असावयास पाहिजे. प्रवेशपत्रिका प्रिन्सिपॉल एच. एल. बेदी ह्यांना लिहून मागवून घ्याव्या.

### मद्रास राज्याच्या नोकरांना विवाहासाठी कर्जे

मद्रास सरकारने आपल्या नोकरांना विवाहासाठी कर्जे देण्याची योजना आखली आहे. स्वतःच्या किंवा स्वतःच्या मुला-मुलींच्या विवाहासाठी सरकारी नोकरांना २,००० रु. किंवा १५ महिन्यांचा पगार (जी रक्कम कमी असेल ती) एवढे कर्ज दिले जाईल. ज्यांच्या नोकरीला पाच वर्षे पुरी झाली आहेत, अशांना हे कर्ज मिळू शकेल. ५० हप्त्यांत ते परत करावे लागेल. प्राव्हिडंट फंडातून घेतलेल्या कर्जावरील व्याजाइतकाच ह्या कर्जावरील व्याजाचा दर राहील.

### पुणे–मिरज ब्रॉडगेज रेल्वे लाईन लवकरच पुरी होणार

पुणे–मिरज रेल्वे रस्ता सध्या मीटर गेजचा आहे, तो ब्रॉड गेजचा करण्याचे काम जून, १९६९ अखेर पूर्ण होईल आणि २ ऑक्टोबर, १९६९ रोजी तो उतारूंच्या वाहतुकीस सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. सध्याचा रस्ता १५९.७५ मैल आहे; नवा रस्ता १७३.४८ मैलांचा होईल. फुरसुंगी आणि राजेवाडी येथील घाट टाळण्यासाठी लांबून रस्ता नेण्यात येईल, त्यामुळे १८०० टनांचे ओझे वेगाने नेता येईल. नव्या रस्त्यामुळे अंतर निम्म्याने कमी होईल. हा नवा रस्ता माहुलीजवळून जाईल, त्यामुळे सातारा शहराला त्याचा फायदा मिळेल. सांगली शहर पुणे-मिरज रस्त्यावर आता येईल. नव्या रुळांसाठी ४८० पूल बांधावे लागले आहेत. त्यांपैकी ५८ पूल मोठाले आहेत. काही तर १०० फूट खोल दरीवर बांधलेले आहेत. सर्वांत मोठा बोगदा १,००० फुटांचा असून त्यात ६० वळणे आहेत. नव्या ब्रॉड गेज रस्त्याला ३५ स्टेशने असतील. सध्या ३२ आहेत. सबंध योजनेस २० कोटी रु. खर्च येईल. मिरज–कोल्हापूर लाईनही पाठोपाठ ब्रॉड गेजची केली जाईल.

### अमेरिकेतील पहिल्या ६६ धनिकांत बॉब होप

'फॉरच्युन' मासिकाने पाहणी करून अमेरिकेतील सर्वांत धनाढ्य लोकांची दरसालप्रमाणे यादी प्रसिद्ध केली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदाचे एक उमेदवार, गव्हर्नर नेल्सन रॉकफेलर आणि दुसरा एक उमेदवार जोसेफ पी. केनेडी ह्यांचे वडील, ह्या दोघांची गणना २० ते ३० कोटी डॉलर्सवाल्यांत होते. (१ डॉलर = ८ रुपये) पॉल गेटी आणि हॉवर्ड ह्यूजेस ह्यांचेजवळ १०० कोटी डॉलर्सचेवर द्रव्य आहे. सबंध जगाला हास्याची विक्री करणारा बॉब होप ह्याचीही गणना ह्या ६६ धनिकांत आहे. त्याचे चित्रपट आणि ध्वनिमुद्रिका, ह्याप्रमाणे त्याचे पुस्तकही (आय ओव्ह रशिया १२०० डॉलर्स) ह्या त्याच्या धनसंपत्तीस कारणीभूत आहे.

### मिसेस मार्टिन ल्यूथर किंग पतीविषयी पुस्तक लिहिणार

डॉ. मॉर्टिन ल्यूथर किंगची विधवा, मिसेस किंग ह्यांना त्यांच्या पतीच्या जीवनावर चरित्र लिहिण्यास एका अमेरिकन प्रकाशन-संस्थेने सांगितले आहे. त्यासाठी त्यांना ५,००,००० डॉलर्स आगाऊ देण्यात आले आहेत. कोणत्याही अमेरिकन लेखकाला एवढी मोठी रक्कम ह्यापूर्वी आगाऊ देण्यात आलेली नव्हती.

**बँकेतील ठेवींना संरक्षण**–डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनने गेल्या वर्षी निरनिराळ्या बँकांतील १ कोटी खात्यांना विम्याचे संरक्षण दिले. प्रत्येक खात्यातील १,५०० रुपयांपर्यंतच्या रकमांना ह्या संरक्षणाचा फायदा मिळणार होता. आता ही मर्यादा ५,००० रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. व्यापारी बँकांतील ९४ टक्के ठेवींना आता विम्याचा फायदा मिळत आहे.

## गुप्त पोलिसांच्या कथा वाचण्याचे वेड

आंध्र प्रदेशांत गुप्त पोलिसांच्या कथा वाचण्याचे वेड पसरत चालले आहे. रेल्वेतील अगर मोटारीतील प्रवाशांच्या हातांत अनेक वेळा ह्या कथांची पुस्तके दिसून येतात. तेलगू भाषेतील गुप्त पोलिसांच्या ह्या कथांना वाढता वाचकवर्ग मिळत आहे. अशा कथा लिहिणाऱ्या लेखकांनी आपली एक संघटनाच बनविली आहे. विद्यार्थीवर्गही ह्या वाचकात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. गुप्त पोलिसांच्या कथा प्रकाशित करण्याचा धंदा आंध्र प्रदेशात चांगला भरभराटीला आला आहे. गुप्त पोलिसांच्या कथा प्रसिद्ध करणाऱ्या निदान २० तरी संस्था असून त्या विजयवाडा, अनगोल, राजमहेंद्री, हैद्राबाद आणि मद्रास ह्या ठिकाणी पसरलेल्या आहेत. त्यांच्या तर्फे दरमहा ६० पुस्तके तरी प्रसिद्ध करण्यात येत असतात. सध्या १५ लेखक विशेष लोकप्रिय झालेले आहेत. लेखकांपैकी एकजण तर २७ वर्षांचाच आहे. नवीन पुस्तक लिहून हातावेगळे करण्यास त्याला अवघे तीन दिवस पुरतात. त्याने आतापर्यंत ५० गुप्त पोलिसकथा प्रसिद्ध केल्या आहेत. प्रत्येक कादंबरीची २,००० प्रतींची आवृत्ती काढण्यात येते. मद्रासमधील एका लेखकाने तर टेप-रेकॉर्डचा उपयोग करून घेतला आहे. प्रथम हा लेखक सर्व कथा तोंडाने टेपरेकॉर्ड करतो आणि नंतर तो पुन्हा वाजवून त्या वेळी लघुलेखक कथा लिहून घेतो. एका प्रकाशकाने पुस्तकांच्या विक्रीसाठी सर्व आंध्र प्रदेशभर एजंटांचे जाळे पसरविले आहे. सुमारे ४०० एजंटांतर्फे पुस्तकांची विक्री करण्यात येते. त्याशिवाय बंगलोर, मुंबई, दिल्ली, श्रीनगर, ह्या शहरांतूनही त्यांची विक्री होते. बहुतेक कथा सुमारे १२५ पानांच्या असतात आणि पुस्तकाची किंमत १॥ रुपया असते.

---

## कच्छतिवूमधील जत्रेचे खरे स्वरूप

पाकच्या सामुद्रधुनीतील कच्छतिवू हे निर्जन बेट कोणाचे ह्याबद्दल भारत व सिलोन ह्यांच्या दरम्यान अलीकडे वाद उत्पन्न झाला होता. ह्या बेटावर पडक्या अवस्थेत असलेले एक चर्च आहे. गेल्या महिन्यात तेथे वार्षिक जत्रा भरविण्यात आली होती. ह्या जत्रेत भाग घेण्यासाठी हजारो लोक तेथे गेले होते. परंतु त्यात धार्मिक भावनेने गेलेले लोक फारच थोडे होते. बरेच लोक चोरट्या मालाचा व्यापार करण्यासाठीच गेले होते. सिलोनमधून आणलेल्या रुग्णोपयोगी अन्नपदार्थांची, नॉयलॉन व इतर कृत्रिम धाग्यांच्या कापडाची, परदेशी दारूची आणि डबाबंद फळांची यात्रेच्या निमित्ताने विक्री करण्यात आली. भारतामधील काही मालही विक्रीसाठी आला होता. त्यांच्या किंमती मात्र भरमसाठ होत्या.

---

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक ' अर्थ '

किंमत ५० पैसे.




---

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गानिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.